# सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय,

शासकीय तंत्र निकेतन परिसर, गाडगे नगर, अमरावती ४४४ ६०३

E-mail:-roamravati.dte@gmail.com Ph.No. :(०७२१) २५७३०२७, २५७२५७७

Website: www.jdroamt.org Fax No. : (०७२१) २५७ ७३१३


कार्यालयीन आदेश

क्र:विकाअ/शिक्षण/गु.यादी/२०१४/ 620

दिनांक :- 23/03/2015

प्रति,

श्रीमती. सुनिता चौधरी, अधि. संगणक अभि, शा.त.नि., अमरावती
श्रीमती. एम.एन. गायकवाड, अधि. गणित, शा.त.नि., अमरावती.

विषय :- शैक्षणिक वर्ष २०१४-२०१५.
Non-AICTE अभ्यासक्रमाच्या प्रवेशित विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता याद्यां तपासणीबाबत.

शैक्षणिक वर्ष २०१४-२०१५ च्या प्रथम वर्ष व थेट व्दितीय वर्ष Non-AICTE अभ्यासक्रमाच्या प्रवेशित विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता याद्यां या कार्यालयात प्रमाणित करण्याचा कार्यक्रम तयार करण्यात आला आहे. या कार्यालयांतर्गत येणा-या अमरावती विभागातील Non-AICTE अभ्यासक्रमाच्या संस्थेच्या गुणवत्ता यादया तपासणी आपणास **दिनांक ३०/०३/२०१५ ते ३१/०३/२०१५ रोजी** या कार्यालयात प्रत्यक्ष उपस्थित राहून संदर्भीय पत्रात दिलेल्या सुचने प्रमाणे पूर्ण करावयाचे आहे. गुणवत्ता याद्या तपासणी करण्याकरिता तपासणी अधिकारी म्हणून आपली नियुक्ती करण्यात येत आहे. तसेच आपणास नियमानुसार प्रवासभत्ता व दैनिक भत्ता आपण ज्या आस्थापनेवर कार्यरत आहे त्या आस्थापनेवरुन देय राहील.

तपासणी संबंधी पुढील प्रमाणे सुचना देण्यात येत आहे. १) तपासणी अधिकारी यांनी शैक्षणिक वर्ष २०१४-१५ चे प्रवेशाची माहीती पुस्तिका (Higher and Technical Education Department, Information Brochure, Admission to First year of post SSC / HSC Diploma Courses in Engineering / Technology & Pharmacy for the Year 2014-15) प्रमाणे तपासणी करण्याबाबत निर्देश देण्यात येत आहे. २) शैक्षणिक वर्ष २०१३-१४ मध्ये नव्याने सुरु झालेल्या संस्थाकडुन व्दितीय वर्षाकरीता मुदतठेवीचा दुसरा हप्ता मा.संचालक, तंत्रशिक्षण, म.रा., मुंबई व संस्था अध्यक्ष यांचे सयुक्त ठेव खात्यात जमा केले किंवा नाही, याबाबतची तपासणी करुन तशी अहवालात नोंद घ्यावी. ३) तसेच शैक्षणिक वर्ष २०१४-१५ मध्ये ज्या संस्थांना नविन अभ्यासक्रम / सुरू असलेल्या अभ्यासक्रमामध्ये वाढ व नविन संस्था सुरु करण्यास मंजुरी मिळालेली आहे अश्या संस्थांनी या कार्यालयाची तपासणी शुल्क भरल्याबाबत कागदपत्रे वाढिव अभ्यासक्रमाचे ठेव ठेवल्याची पावती व अंतिम मान्यता प्रमाणपत्रे इत्यादीच्या गुणवत्ता यादी सोबत साक्षांकीत प्रति जोडण्यास कळवावे. नविन संस्थांनी त्यांना मिळालेली एआयसीटीई/संचालक/महाराष्ट्र शासन यांचे मान्यतेची पत्रे सोबत जोडण्यास यावी. मुदत ठेवीची पावती या कार्यालयास भरलेली तपासणी शुल्काची कागदपत्रे गुणवत्ता याद्यांसोबत जोडण्यास सांगावे. ४) संबंधीत संस्थांव्दारे सादर करण्यात आलेली प्रवेशित विद्यार्थ्यांची यादी संचालनालयाच्या

संकेतस्थळावर अपडेट करुन प्राचार्यांच्या नांव, सही शिक्यासह गुणवत्ता यादीसोबत जोडलेली असावी. संचालनालयाच्या संकेतस्थळावर अपलोड केलेली यादीव तपासणी अधिकाऱ्यांनी आपल्या सही शिक्यासह प्रमाणित करावी. ज्या उमेदवाराच्या कागदपत्रामध्ये त्रृटी असेल अश्या उमेदवाराची त्रृटी दर्शविण्याकरीता या कार्यालयाव्दारे स्वतंत्र प्रपत्र पुरविण्यात येईल व अश्या उमेदवाराच्या त्रृटी त्याच प्रपत्रात दर्शविण्यात यावे.

सहपत्रे :- वरीलप्रमाणे.

(डी. एन. शिंगाडे)
प्र.सहसंचालक तंत्र शिक्षण,
अमरावती.

प्रत :-

(१) मा.संचालक, तंत्र शिक्षण,म.रा.,मुंबई यांना माहिती करिता सादर.
(२) प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, अमरावती यांना कळविण्यात येते की, त्यांनी संबंधित अधिका-यांना उपरोक्त कालावधीत कार्यमुक्त करावे.
(३) प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्यासाठी.